**प्रेस नोट** **दिनांक २०/०८/२०२५**

लोकसेवीका आम्रपाली लक्ष्मणराव काकडे, वय ३८ वर्षे पद ग्रामपंचायत अधिकारी, ( ग्रामसेविका ) ग्रामपंचायत कार्यालय किन्होळा पंचायत समिती परभणी. यांनी ८,०००/- रुपयांची लाच स्विकारले प्रकरणी असीबीच्या जाळयात.

| | |
|---|---|
| युनिट | लाप्रवि युनिट परभणी |
| पो.स्टे.गुरनं व कलम | पो.स्टे नवामोंढा गुरनं ३७४/२०२५ कलम - ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ |
| गुन्हा दाखल दिनांक | दिनांक २०/०८/२०२५ रोजीचे २२:०७ वा. |
| आरोपी यांचे नाव, हुद्दा व पत्ता. | लोकसेवीका आम्रपाली लक्ष्मणराव काकडे, वय ३८ वर्षे पद पद ग्रामपंचायत अधिकारी ( ग्रामसेविका ), ग्रामपंचायत कार्यालय किन्होळा, ता.जि. परभणी. |
| लाच स्विकारली रक्कम | ८,०००/- रुपये. |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार यांना व त्यांच्या आईच्या नावे पंतप्रधान आवास योजने अंतर्गत घरकुल योजना मंजुर झाले आहे. त्यांना पहिला हप्ता प्रत्येकी १५,०००/- रुपये एकुण ३०,०००/- रु. दिनांक २१/०७/२०२५ रोजी त्यांच्या बॅंक खात्यावर अदा झाला होता.

सदर तक्रारदार यांना घरकुलाचे काम सुरू करण्याचे अनुषंगाने आवश्यक असणारे कागदपत्राची फाईल घेवून तक्रारदार यांनी लोकसेविका पद ग्रामपंचायत अधिकारी ( ग्रामसेविका )यांना दिनांक १४/०८/२०२५ रोजी दुस-या हप्त्या विषयी विचारणा केली त्यावेळी लोकसेविका यांनी तक्रारदार यांना संपुर्ण फाईल तयार करुन एका फाईलचे ५०००/- रु. असे दोन फाईलचे एकुण १०,०००/- रुपये लागतात असे सांगून लाचेची मागणी केली. परंतू तक्रारदार यांना लाचदेण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १८/०८/२०२५ रोजी अे.सी.बी परभणी युनिट येथे तक्रार अर्ज दिला.

दिनांक१८/०८/२०२५ रोजी पद ग्रामपंचायत अधिकारी ( ग्रामसेविका ) यांनी राहते घरी बोलावल्याने पंचासह पडताळणी केली असता पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेविका आम्रपाली काकडे यांनी तक्रारदार यांना तडजोडअंती प्रत्येकी फाईल ४०००/- रु. याप्रमाणे दोन फाईलचे ८०००/- रु. लाचेची मागणी पंचा समक्ष केली.

आज दिनांक २०/०८/२०२५ रोजी सापळा कारवाई दरम्यान लोकसेवीका आम्रपाली लक्ष्मणराव काकडे पद ग्रामपंचायत अधिकारी ( ग्रामसेविका ) ग्रामपंचायत कार्यालय किन्होळा , ता.जि. परभणी यांनी त्यांचे राहते घरी कारेगावरोड परभणी येथे पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडून ८००० /- रु लाचेची रक्कम स्विकारली आहे. लोकसेवीका आम्रपाली काकडे यांना लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| सापळा पथक | श्री महेश पाटणकर, पोलीस उप अधीक्षक, श्रीमती मनिषा पवार पोलीस निरीक्षक, मपोह/सिमा चाटे, पोशि/कल्याण नागरगोजे, राम घुले, शेख जिब्राईल, चापोशि लहाडे, सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी. |
| सापळा व तपास अधिकारी | श्रीमती मनिषा पवार, पोलीस निरीक्षक लाप्रवि परभणी. ९८२३०६७३४७ |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या इसमाविरुध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.**


| | |
|---|---|
| **संपर्क पत्ता :- कार्यालय पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, शनिवार बाजार,नानलपेठ, परभणी.** | |
| दुरध्वनी क्रमांक :- 02452-220597 टोल फ्री क्रमांक:- 1064 ऑनलाईन ॲप acbmaharastra.net | |
| spacbnanaded@mahapolice.gov.in | dyspacbparbhani@mahapolice.gov.in |
| Facebook : Acb Parbhani | Facebook page : Anti Corruption Bureau,Parbhani. |
| Instagram : acbparbhani | Twitter : @ACBPARBHANI |
| Youtube Channel @ACBParbhani | Find us on Google Map & Mappels india Map |
| **9272111064** | |


पोलीस उप अधिक्षक अँटी करप्शन परभणी

(महेश पाटणकर)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी